GRT

GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 9 | MARCH – 2017

# मंगळवेढ्याचे शिल्प वैभव : एक ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. माने ए. एस.**
इतिहास विभाग प्रमुख
श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा, जि.सोलापूर.

## प्रस्तावना:

मंगवळेढा हे महाराष्ट्रातील एक धार्मिक स्थळ, संतांचे माहेरघर, वारकरी संप्रदायाचे 'आद्यपीठ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि 'दक्षिण काशी' म्हणून प्रसिध्द असणाऱ्या पंढरपूर पासून दक्षिणेस २२ कि.मी. अंतरावर मंगळवेढा हे ठिकाण आहे. मंगळवेढ्यास 'दामाजीचे मंगळवेढेही' म्हणून ही ओळखले जाते. महाराष्ट्रामध्ये देहू, आळंदी (जि. पुणे) नेवासे (जि. अहमदनगर), पैठण (जि.औरंगाबाद), तेर, तुळजापूर (जि.उस्मानाबाद), त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) कोल्हापूर, पंढरपूर, बाशी, अरण (जि.सोलापूर) इ. तिर्थक्षेत्रे आहेत. त्यामध्ये मंगळवेढा या तिर्थक्षेत्राचा ही समावेश होतो. मंगळवेढ्यातील संत परंपरेने महाराष्ट्रातील आणि कर्नाटकातील माणसांच्या (भाविकांच्या) हृदयात वेगळेच स्थान निर्माण केले आहे.'


Sant Damaji Temple

अशा या मंगळवेढा शहराचे महत्व महाराष्ट्रातील आणि मंगळवेढ्यातील संतांनी मुक्त कंठाने गायिले आहे.'

## मंगळवेढा नावाची उत्पत्ती:

मंगळवेढ्याचे प्राचीनत्व हे मंगळवेढा नावाच्या उत्पत्ती वरून लक्षात येते. मंगळवेढा शहर कधी बसले (निर्माण झाले) या बद्दल पुरावा मिळत नाही परंतु मंगळवेढा नावाच्या उत्पत्ती बद्दल काही आख्यायिका सांगितल्या जातात. शालीवाहन शकाच्या सुरवातीस हे शहर चालुक्य राजा 'मंगलेश' याच्या अधिपत्याखाली होते. त्याच्या नावावरूनच मंगळवेढा शहरास मंगळवेढा हे नाव पडले असावे असे सांगितले जाते. तसेच मंगळवेढा शहरास वेगवेगळ्या कालखंडामध्ये मंगळवेढा, मंगळवेष्टित, मंगलीवेढा, मंगलबेढा अशा नावे होती. मंगल (मंगलेश) राजाच्या अगोदर या शहराचे प्रचीन नांब 'जीवनपुरी' होते.

प्राचीन काळी मंगळवेढा या ठिकाणी 'मंगलाई' नावाची देवी होती. आणि तिच्या नावाबरूनही या शहरास 'मंगळवेढा' असे हे नांब पडले असावे अशी आख्यायीका सांगितली जाते. तसेच 'भीमा महात्म्य आणि स्कंदपुराणामध्ये' मंगळवेढा शहराचा 'मेतूलिंगपूरी' असा उल्लेख आढळतो. कौरवांनी पांडवांना युतक्रिडेमध्ये. पराजित करून त्यांचे राज्य जिंकले आणि त्यांना १२ वर्षे वनवास व ९ वर्ष अज्ञातवास अशा शिक्षा दिली. या बनवासाच्या कालावधीमध्ये हे पाच पांडव मंगळवेढा परिसात वास्तव्यास होते.” त्यावेळी या ठिकाणी जंगल असून जमीन उंच सखल होती. धर्मराजाच्या आज्ञेनुसार अर्जुनाने आपल्या धनुविद्येच्या सहाय्याने येथील जंगल नष्ट केले तर भिमाने त्याच्या महाकाय गदेच्या सहाय्याने उंच सखल जमीन सपाट केली आणि कालांतराने या ठिकाणी मानवाची वस्ती निर्माण झाली अशी आख्यायिका सांगितली जाते. असे असले तरी मंगळवेढा हे

चालुक्य राजा मंगल (मंगलेश) याने बसविले ब मंगळवेढा ही त्याची राजधानी होती. मंगळवेढा या ठिकाणी विविध राजे-राजघराणी प्राचीन काळापासून अस्तित्वात होती. त्यामध्ये कानचुरी, चालुक्य, देवगिरीचे यादव, बहामनी, बरीदशाही, विजापूरची आदिलशाही, मोंगल, मराठे आणि पेशवे इत्यादींनी वेगवेगळ्या कालखंडात मंगळवेढ्यावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. पेशवाईनंतर मंगळवेढा पटवर्धनांच्या सांगली संस्थानचा एक महत्वाचा भाग बनला आणि नंतर ८ मार्च १९४८ रोजी सांगली संस्थान भारतीय संघ राज्यात विलीन झाले. काळाच्या ओघात जरी येथील (प्राचीन) घराणी नष्ट झाली असली तरी मंगळवेढ्याचे महत्व प्राचीन काळापासून टिकून असलयाचे येथील मंदिरे, वाडे, मूती, शिल्पे, वास्तू यावरून दिसून येते. त्याशिवाय या ठिकाणी संत दामाजीपंत, संत चोखोबा, संत कान्होपात्रा, श्री स्वामी समर्थ, संत सिताराम महाराज, उजव्या सोंडेचे गणेश मंदिर, महादेव मंदिर इ. मंदिरे, गैरी पिर साहेब दर्गा, गोपाबाईची विहिर इ. प्रमुख जुन्या वास्तू उल्लेखनिय आहेत. तसेच जुन्या वास्तुंचे अवशेष, मूर्ती-विविध नक्षीचे दगड, एक जैन प्राकृत ब काही मराठी, कानडी शिलालेख आहेत. शिवाय या मंदिराची हेळसांड झाली असावी. पुढे इ.स. १५७२ मध्ये विजापूरीला आदिलशाहीचे राज्य असतांना 'हिप्परगे' येथील कुलकर्णी मंगळवेढ्याला मुजूमदारी करीत असतांना त्याने या देवालयाचा जिर्णोद्वार मुल्लाच्या सहमतीने केला असे सांगितले जाते.

## वरूण मूर्तीः

वरूण मूर्ती या देवतेच्या सहसा आढळत नाहीत. गंगा आणि वरूण या देवतांचे वाहन मकर आहे. हत्तीची सोंड, मंगरीचे तोंड, माशाचे कल्ले, मोराचा पिसारा, वाघाचे पंजे असलेला हा काल्पनिक पशू आहे. वरुण या देवतेच्या पूजेसाठी त्याची प्रतिमा तयार केली जात नसून कलशावरच त्याचे आवाहन केले जात असे. म्हणून त्याच्या प्रतिमा सहसा कोठे आढळत नाहीत. पौराणिक परंपरेप्रमाणे 'पाश' हे वरुणाचे मुख्य आयुध आणि 'मगर' हे वाहन या मुख्य चिन्हावरूनच वरुण मूर्ती ओळखली जाते. यास शुभ लक्ष्मी, शुभशकुणी मानले जाते. अशी ही वरुण मूती मंगळवेढा येथील डांगे गल्लीतील शिंदे यांच्या घराच्या पायामध्ये सापडली. ही मूर्ती दीड फूट लांब व १ फूट रूंद जाडीची आहे. दगडाच्या दोन्ही अंगास डाव्या आणि उजव्या स्वरुपात ही मूर्ती कोरलेली आहे. या मूर्तीच्या एका हातात कलश व दुसरा हात बर केलेला आहे. गळ्यात किरीट, कुंडले आदि अलंकार असून ही मूर्ती हसतमूख आहे.'

## शरभ मूर्तीः

शरभ ही मूर्ती मंगळवेढा शहरातील मारुती मंदिराच्या उजवया बाजूस आहे. अशी ही मूर्ती ३ फूट उंचीची असून हा एक काल्पनिक पशू आहे. शरभ या देवते विषयी एक आख्यायिका सांगितली जाते. विष्णूने नृसिंहाचे रुप धारण करून हिरण्य कश्यपूस मारले. परंतु खून चढल्यामुळे त्याची उग्रता कमी होईना तेंव्हा सर्व सृष्टी शंकरास शरण गेली, तेंव्हा शंकराने २ तोंडे, ८ पाय, २ पंख ब लांब शेपूट असलेल्या शरभाचे रुप धारण करून नृसिंहास ठार मारले आणि त्याचे कातडे पांघरले व डोके मुकूटावर धारण केले." अशा आख्यायिका सांगितली जाते. या मूर्तीस ३ पाय, सिंहाचे तोंड व शरीर, शेपटी व पाश, मृग व अग्नि अशा वस्तू धारण करणारे चार हात दाखविले आहेत. शरभाने नृसिंहास पकडून ठेवले असून आपल्या हातांनी सुटण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा स्वरूपातील एक मूती मंगळवेढ्यामध्ये पहावयास मिळते.

## ब्रम्हदेव मूर्तीः

विश्वाचा निर्माता ब्रम्हदेवास मूर्ती स्वरुपात पूजण्याचा शाप असल्याने त्याची उपासना व पूजा केली जात नाही. परिणामी त्याची मंदिरे व मूती खूप कमी प्रमाणात आढळतात. 'ब्रम्हदेवाच्या अपूज्ये विषयी विविध आख्याविका सांगितल्या जातात. "ब्रम्हदेवाने एके दिवशी यज्ञाच्यावेळी आपल्या पत्नीस बोलविले असता ब्रम्हदेवाच्या पत्नीला येण्यास उशिर झाला, तेंव्हा ब्रम्हदेवाने आपली दूसरी पत्नी 'सरस्वती' बरोबर यज्ञ कार्यास सुरूवात केली. हे बघून पहिली पत्नीस राग आला व तिने

ब्रम्हदेबाला 'अपूल्य होशील' असा शाप दिला" अशी आख्यायिका सांगितली जाते. याशिवाय अशा विविध आख्यायिका प्रचलीत आहेत. यामुळेच ब्रम्हदेवाच्या मूती व मंदीरे फार कमी प्रमाणात असल्याचे आढळते. ज्या काही मूर्ती सापडल्या आहेत. त्यांचे प्रमाणही खूप कमी आहे. त्यापैकी एक मूर्ती मंगळवेढ्यामध्ये आहे. या मूर्तीस चार तोंडे, चार हात असून तो कमळावर बसलेला आहे व त्याचे वाहन हंस आहे. या मूर्तीच्या एका हातात गाथा, माळा, कमंडलू, यज्ञपात्रे आणि बर अभय मुद्रा असे त्याचे एकूण वर्णन आढळते. युध्दाशी ब्रम्हदेवाचा संबंध नसल्यामुळे त्याच्या हातात शस्त्र दिसत नाही.

अशाप्रकारची ब्रम्हदेवाची मूर्ती मंगळवेढ्यामध्येही पहावयास मिळते. ही ब्रम्हदेव मूर्ती काशी विश्वेश्वर मंदिरा शेजारील विहीरीमध्ये आहे. ही मूर्ती ६ फूट उंच ब ४ फूट रुंदीच्या शिळेवर कोरलेली आहे. ब्रम्हदेवाच्या चार मुखापैंकी या मूर्तीमध्ये तीन मुखे दर्शविली आहेत. त्या पैकी मध्याल्या मुखाला लांब दाढी असून डोक्यावर कोरीव मुकूट, अलंकार, याज्ञोपवीत, हार यांनी सजलेली ही मूर्ती समभंग अवस्थेत असून तिच्या पायात तोडे आहेत. या मूर्तीस चार हात आहेत. या हातामध्ये भूक (यज्ञाची पळी), पोथी, कमंडलू, अक्षमाला इत्यादी वस्तू आहेत. या मूर्तीच्या पायाजवळ उजव्या बाजूस हंस वाहन, सरस्वती व डावीकडे देवी प्रतीमा आणि ब्राम्हण कोरलेले आहेत. ब्रम्हदेवास मूर्ती पूजेचा शाप असल्याने त्याच्या मूर्ती कृष्णदेवराय यांचा 'टोप' यामध्ये साम्य (आहे) असल्याचे दिसते. एकूणच विजयनगर आणि मंगळवेढ्याचा संबंध असल्याचे यावरून स्पष्ट होते. परंतू लिखित किंबा बिश्बसनीय पुराव्या अभावी हे स्पष्ट होबू शकत नाही. परंतु या विषयी अधिक संशोधन होणे गरजेचे आहे.

या बरोबरच काशिविश्वेश्वर मंदिराच्या पाराबरील सुर्य प्रतिमा, विहीरीतील चामुंडा, खंडोबा गल्लीतील महिषासूर मर्दिनीच्या तीन मूर्ती, कैकाडी विहीरीजबळ पार्श्वनाथ, किल्ल्यातील शिव योग्याची प्रतिमा (शिवमुख), गैंबीपीर दर्ग्याजवळील शंृगारलेले हत्ती, विखरुन पडलेले स्तंभ, तळखेड, गणेश पट्ट्या, ऐतिहासिक कृष्ण तलाव, गोपाबाईची विहीर अशा अनेक धार्मिक व इतिहास प्रसिध्द व्यक्तिंचा मंगळवेढ्याशी संबंध दाखविणाऱ्या शिल्प वैभवाचे जतन व संवर्धन भावी पिढीला प्रेरणा दायी ठरेल.

## संदर्भ व तळटिपाः


1. महाराष्ट्र राज्य परिचय, खंड १, महाराष्ट्र स्थल दर्शन, पृ.क्र. ७६४-७६५
2. चौधरी डी.एम., पंढरपूर नगरीचा इतिहास, अप्रकाशित पीएच.डी., प्रबंध (इतिहास), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 5 २००६३, पृ.क्र. ७
3. जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृती कोश, खंड ६, भारतीय संस्कृती कोश निर्मिती मंडळ, पुणे-१९२०, पृ.क्र. ६३३-६३४
4. कित्ता, पृ.क्र. ६३३
5. अभ्यंकर शंकर वासुदेव, भारतीय तौर्थक्षेत्र व मंदिरे, भक्तिकोश, पंचम खंड, आदित्य प्रकाशन, पुणे, ३० मार्च २००६, पृ.क्र. १९४८
6. भारत इतिहास आणि संस्कृती (त्रमासिक) वर्ष २४ वे ऑक्टो.-डिसेंबर १९८७, पुस्तक ९५, पृ.क्र. २
7. श्रीमद् ए.सी. भक्‌्तिवेदांत, भगवत्गीता (जशी आहे तशी) पार्श्वभूमी.
8. आवताडे नानासाहेब व्यंकटेश, श्री संत दामाजी चरित्र, श्री दामाजी संस्था, मंगळवेढा २००६३, पृ.क्र. ८
9. केतकर श्रीधर व्यंकटेश, महाराष्ट्रीय ज्ञानकोश (मं.) खंड १८, महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ, नागपूर, १९२६, पृ.क्र. ९
10. उपरोक्त, चौधरी डी.एम., पृ.क्र. ७
11. जोशी महादेवशास्त्री (संपा.), मराठी विश्वकोश खंड १२, महाराष्ट्र राज्य विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई, पृ.क्र. ८६०
12. दैनिक सोलापूर समाचार, वृत्तपत्र, २७ ऑगस्ट १९७२
13. देशपांडे, प्र.न., (संपा.), समग्र राजवाडे साहित्य, खंड ४, वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९९८, पृ.क्र. ५६

**14.** जोशी नी.पू., भारतीय मूर्तीशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती मंडळ, नागूपर, प्रथमावृत्ती १९७९, पृ.क्र. ३११

**15.** दैनिक संचार वृत्तपत्र, सोलापूर आवृत्ती ७ ऑगस्ट १९९९, पृ.क्र. १२

**16.** खरे ग.ह. मूर्ती विज्ञान, भारत इतिहास संशोधक मंडळ पुरस्कृत, ग्रंथमाला क्रमांक ३५, १९३९, पृ.क्र. १३०

**17.** माटे म.श्री., प्राचीन कलाभारती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - प्रथमावृत्ती, १९९८, पृ.क्र. १४०

**18.** दैनिक सकाळ, वृत्तपत्र - सोलापूर, आवृती अंक १०३, १४ एप्रिल २००१

**19.** दैनिक संचार, वृत्तपत्र, सोलापूर आवृत्ती ७ ऑगस्ट १९९९, पृ.क्र. १२